पुणे पोलीस

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

प्रेसनोट क्र. ३०६१ दि. २२ /०९/२०१९

## प्रेस नोट

**दरोडयाच्या गुन्हयातील दोन वर्षापासुन फरार असल्येल्या आरोपीच्या कोथरुड पोलीसांनी मुसक्या आवळल्या**

दिनांक २०/०९/२०१९ रोजी कोथरुड पोलीस ठाणेकडील पोना/विजय कांबळे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वारजे पोलीस ठाणेचे जबरी चोरीच्या गुन्हयातील फरार असलेला आरोपी अमोल क्षिरसागर हा सुतारदरा येथे येणार असलेची माहिती पोना/७८८६ विजय कांबळे यांना बातमीदारा मार्फत प्राप्त झालेली होती. बातमी प्रमाणे सपोनि/संदिप बुवा, पोना/७८८६ कांबळे, पोकॉ/७८५४ शेळके, पोकॉ/८११६ जगदाळे असे साम्राज्य पेठकर जवळुन सुतारदराकडे जाणारे रोडवर सापळा रचुन थांबले असता फरार आरोपी अमोल क्षिरसागर हा तेथे आल्यावर त्यास ताब्यात घेतले. सदर प्रकरणी अधिक तपास केला असता समजले की,

वारजे पोलीस ठाणेच्या हद्दीत फिर्यादी पंकज नागेंद्र पांडे, रा. डी/६, ट्रॅक्युलिटी सोसायटी, कोंदे नगर, सोलापुर रोड, शेवाळवाडी, पुणे हे दिनांक ०२/१०/२०१७ रोजी दुपारी १२.३० वा. त्यांचे अॅक्टीव्हा मोटर सायकल एम.एच १२ एम.एक्स ९२८९ वरुन मुंबई बेंगलोर हायवेने डुक्कर खिंडीचे पुढे येऊन तेथुन सर्व्हिस रोडने सिपला सेंटरकडे जात असताना त्यावेळी दोन मोटर सायकल वरील ५-६ अनोळखी इसमांनी फिर्यादीला चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीचे जवळील अॅक्टीव्हा गाडी व फिर्यादीचे कलेक्शनचे ४,५३,२५५/- रुपये रोख रक्कम व दोन चेक जबरदस्तीने काढुन घेऊन पळुन गेले होते. सदर प्रकरणी वारजे पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३६६/२०१७ भादवि कलम ३९५,३९२,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. सदर गुन्हयाचे तपासकामी एकुण ५ आरोपींना अटक करण्यात आले होते. सदर तपासा दरम्यान आरोपी नामे अमोल आप्पाराव क्षिरसागर, वय ३२ वर्षे, रा. रा. बौध्द विहारचे मागे, राम नगर, बोपखेल, ता. हवेली, जि. पुणे याचा देखील गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झालेले होते. आरोपी अमोल आप्पराव क्षिरसागर याने मा. जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे येथे अटक पुर्व जामीनासाठी सन २०१७ मध्ये अर्ज केलेला होता. परंतु मा. न्यायालयाने आरोपीचा अटक पुर्व जामीनाचा अर्ज नामंजुर केलेला होता. मागील दोन वर्षा पासुन आरोपी अमोल क्षिरसागर हा फरार होता. आरोपी अमोल आप्पाराव क्षिरसागर यास पुढील तपासकामी वारजे पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई श्रीमती प्रतिभा जोशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोथरुड पोलीस ठाणे व शिवाजी शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), कोथरुड पोलीस ठाणे यंचे मार्गदर्शनाप्रमाणे सपोनि/संदिप बुवा, पोना/७८८६ कांबळे, पोकॉ/७८५४ शेळके, पोकॉ/८११६ जगदाळे यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
कोथरुड पोलीस ठाणे, पुणे शहर